# जाहीर सुचना

महावितरण संवसु मंडळ गडचिरोली /आलापल्ली/ब्रम्हपूरी विभागाच्या आस्थापनेवर एक वर्ष ( 2024- 2025) कालावधी करीता विजतंत्री/तारतंत्री व कोपा (COPA) व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यासाठी दिनांक 21.06.2024 ते 28.06.2024 पर्यंत 6.15 वाजेपर्यंत www.pprenticeshipindia.org या संकेतस्थळावर खालील नोंदणी क्रमांकवर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव | आस्थापना क्रमांक | विजतंत्री | तारतंत्री | कोपा | एकुण जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गडचिरोली विभाग | E04172700335 | 21 | 16 | 7 | 44 |
| 2 | ब्रम्हपूरी विभाग | E04172700056 | 15 | 11 | 2 | 28 |
| 3 | आलापल्ली विभाग | E05202702239 | 18 | 13 | 04 | 35 |

**सदर भरती मध्ये गडचिरोली जिल्हयासह गडचिरोली मंडलाच्या कार्यक्षेत्रातील ब्रम्हपुरी, नागभिड व सिंदेवाही या तालुक्यातील रहीवासी असलेल्या उमेदवाराचे अर्ज ग्राहय धरले जातील.**

(1) **शैक्षणिक अर्हता** - महाराष्ट्र राज्य शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री / तारतंत्री व कोपा या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (2) **वयोमर्यादा** :- दिनांक 07.06.2024 रोजी किमान वय 18 वर्ष पूर्ण होणे आवश्यक आहे. मागासवर्गीयासाठी 05 वर्षे शिथिलक्षम. (3) **विद्यावेतन:** शासकीय नियमाप्रमाणे देय राहील. (4) शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेशी निगडित सर्व अधिकार व्यवस्थापनाकडे राखीव असतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. (5) एस. एस. सी उत्तीर्ण गुणपत्रिका, प्रमाणपत्राची प्रत व आधार कार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी (6) आय. टि. आय. प्रमाणपत्राची सांक्षाकीत प्रत व गुणपत्रिका (चार सेमिस्टर ) पोर्टलद्वारे जोडण्यात यावी. (7) उमेदवार मागासप्रर्वगातील असल्यास जात प्रमाणपत्राची सांक्षाकीत केलेली छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक राहील. (8) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने राजकीय व्यक्ती किंवा इतर अधिकाऱ्याकडून दबाव आणल्यास उमेदवारी अर्ज रद्द करण्यात येईल. (9) उमेदवारांचे ऑनलाईन व्यतीरीक्त इतर माध्यमातून आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच उमेदवारांनी (online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मूळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रीतीने अपलोड करणे आवश्यक राहील. (10) वरील प्रमाणे नमुद कालावधीत सादर केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येईल व पुर्वीच्या तारखेस सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. (11) ऑनलाईन (online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित असलेला स्वत:चा E-mail ID व Mobile No. पोर्टलद्वारे नोंदविणे आवश्यक आहे. (12) उमेदवाराची निवड ही आय. टि. आय. मधील प्राप्त गुणपत्रिकेच्या गुणवत्तेवर (Merit List) करण्यात येईल. (13) उमेदवाराने/गडचिरोली आलापल्ली/ब्रम्हपूरी यापैकी कोणत्याही एकाच विभागात ऑनलाईन अर्ज सादर करावा, एका पेक्षा जास्त विभागामध्ये अर्ज सादर केल्यास अर्ज रद्द करण्यात येईल तसेच याबाबत उमेदवारास कळविले जाणार नाही. (14) उमेदवाराने सादर केलेल्या ऑनलाईन अर्जानुसार उमेदवाराची विभाग निहाय निवड यादी कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसारित करण्यात येईल.

**पी.आर.ओ. क्र.-35**
**दि. 19.06.2024**

**अधिक्षक अभियंता**
**महावितरण, संवसु मंडल, गडचिरोली**

Mahasarkarinaukri.in